بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ نَحْمَدُهٗ وَنُصَلِّيْ عَلٰى رَسُوْلِهِ الْكَرِيْمِ وَعَلٰى عَبْدِهِ الْمَسِيْحِ الْمَوْعُوْدِ

لَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰهِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

**Office Of The Majlis Ansarullah Bharat**

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع:گورداسپور (پنجاب)

# ❖बदर युद्धाबाबत पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) चे चरित्रात्मक ऐतिहासिक व श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

# ❖मध्य पूर्व मध्ये युद्धस्थिती बाबत विशेष प्रार्थनांचे आवाहन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. १३-१०-२०२३ स्थान मशिद मुबारक टिलफर्ड, लंडन

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा पठन केल्यानंतर हुजूर अनवर म्हणाले: पवित्र पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जीवनातील काही घटना ज्या बदरच्या प्रसंगी किंवा बदरहून परत येताना घडल्या त्यांचा उल्लेख केला जात आहे.

हजरत उस्मान बिन माझून (र.ज)ची पत्नी खुला बिंत हकीम, उम्मुल-मुमिनीन हजरत खदिजाह रदियाल्लाहू अनहा यांच्या मृत्यूनंतर एके दिवशी पैगंबर (स.)च्या सेवेत आल्या आणि म्हणाल्या: हे अल्लाहचे प्रेषित! काय तुम्ही लग्न करणार नाहीत? ते म्हणाले कोणासोबत? खुला म्हणाली की तुम्हाला पाहिजे तर कुमारी आहे आणि विधवा सुद्धा. पैगंबर (स.) च्या विचारण्यावर, खुलाने सांगितले की कुमारी आयशा बिंत अबू बकर आहे, तर विधवा सौदा बिंत झमआ आहे. पवित्र प्रेषित (स.) म्हणाले: जा! आणि त्या दोघांच्या घरच्यांशी माझ्याबद्दल बोला. हजरत खुला यांनी सर्वप्रथम हजरत अबू बकर सिद्दीक यांच्या घरी स्थळ प्रस्तूत केले. हजरत अबू बकर सिद्दीक (र.ज.) यांच्या संमतीनंतर, पवित्र प्रेषित (स.) यांनी हजरत आयशा (र.जि.) यांच्याशी विवाह केला. हजरत आयशा (र.) यांनी सांगितले की, लग्नानंतर पैगंबर (स.) यांनी सांगितले की, तुमच्याशी लग्न करण्यापूर्वी तुम्ही मला स्वप्नात दोनदा दिसले होते.

हजरत आयशा (र.) यांचे लग्न झाले तेव्हा दांभिक किंवा दुष्टांनी त्यांच्या तरुण वयाविषयी कोणताही आक्षेप घेतला नाही. जर त्यांच्या वयाबद्दल असे काही असते तर या लोकांनी आक्षेप घेतला असता. हजरत अपेक्षित मसीहा(अ.स.) म्हणतात की हजरत आयशा नऊ वर्षांची होती हे कथन निरर्थक आहे.

हजरत मिर्झा बशीर अहमद साहिब हजरत आयशा (र.) च्या वैशिष्ट्यांचा उल्लेख करताना म्हणतात की, लहान वयातही हजरत आयशाची स्मरणशक्ती खूप चांगली होती आणि प्रेषित मुहम्मद (स.) च्या शिक्षण आणि प्रशिक्षणामुळे त्यांची खूप लवकर प्रगती झाली. आणि खरं तर, त्यांना इतक्या लहान वयात आपल्या घरी आणण्यामागे पवित्र पैगंबरांचा हेतू त्यांना प्रशिक्षित करणे आणि त्यांना पैगंबर (स.) च्या सहवासात बर्याच काळासाठी राहण्याची संधी देणे हा होता आणि त्यांना त्या अत्योच्च कार्याच्या प्रशिक्षत केले जाऊ लागले जे पैगंबराच्या पत्नीचे अत्योच्च कर्म होते. आणि मग हजरत आयशा यांनी मुस्लीम महिलांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणाचे कार्य पूर्ण केले, ज्याची जगाच्या इतिहासात कोणतेही उदाहरण नाही. पैगंबरांच्या हदीसचा एक मोठा आणि आवश्यक भाग त्यांच्या परंपरांवर आधारित आहे. त्यांच्याकडून कथन केलेल्या परंपरांची संख्या दोन हजार दोनशे दहापर्यंत पोहोचते. धर्मपरायणता आणि ज्ञानाचा इतका प्रचंड मार्तब होता की महानतम सोबती देखील या संदर्भात त्यांच्याशी संपर्क साधत असत.

पवित्र पैगंबर (स.) एका प्रसंगी म्हणाले की, स्त्रियांमध्ये फार कमी परिपूर्णता असते. मग त्यांनी फिरऔन ची पत्नी आसिया आणि मरियम बिंत इम्रानची ह्यांचा उल्लेख केला आणि सांगितले की आयशाचे स्त्रियांवर तितकेच श्रेष्ठत्व आहे जितके इतर अरब पाककृतींपेक्षा सरीदचे आहे. हजरत आयशा, पवित्र पैगंबर (स.) च्या निधनानंतरही ४८ वर्ष जीवित राहिल्या आणि रमजान ५८ हिजरी महिन्यात ते मृत्यु पावले. त्या ६८ वर्षांचे होते.

बदरच्या कैद्यांमध्ये पैगंबर (स.) यांची मुलगी हजरत जैनब यांचे पती, अबुल आस बिन अल-रबी, होते. त्यांना मुक्त करण्यासाठी हजरत जैनाबने मक्केतून तिचा हार पाठवला जो तिला तिच्या लग्नाच्या निमित्ताने तिची आई हजरत खदिजा यांनी दिला होता. तो हार पाहून पवित्र पैगंबर (स.) खूप दुःखी झाले आणि साथीदारांना म्हणाले, जर तुम्हाला योग्य वाटत असेल तर झैनबच्या कैद्याची सुटका करा आणि हा हार तिला परत करा. साथीदार म्हणाले, हे अल्लाहचे प्रेषित! पवित्र पैगंबर (स.) अबुल आसला या अटीवर सोडले होते की ते मक्केला जाताच त्यांची पत्नी जैनब हिला मदीनाला स्थलांतरित करण्याची परवानगी देईल. काही काळानंतर अबुल-आस देखील मदिना येथे स्थलांतरित झाले आणि अशा प्रकारे पती-पत्नी पुन्हा एकत्र आले.

प्रवचनाच्या दुस-या भागात हुजूर अनवर म्हणाले की, आज जगातील परिस्थितीसाठी मी प्रार्थनाचे आवाहन करू इच्छितो. या युद्धामुळे दोन्ही बाजूंच्या स्त्रिया, लहान मुले आणि वृद्ध लोकांची अंदाधुंद हत्या होत आहे.

इस्लाम, स्त्रिया आणि लहान मुले आणि जे युद्धाच्या परिस्थितीतही कोणत्याही प्रकारे युद्धात सहभागी होत नाहीत त्यांच्याहत्येला परवानगी देत नाही. पवित्र पैगंबर (स.) यांनी यावर खूप जोर दिला आहे. जग म्हणत आहे आणि काही वस्तुस्थिती अशीच आहे

की या युद्धात पुढाकार हमासने घेतला आहे, जरी इस्रायली सैन्याने कितीही निष्पाप पॅलेस्टिनी मारले असले तरी, पण मुस्लिमांनी इस्लामी शिकवणी पाळली पाहिजेत. इस्रायली सैन्याने जे केले ते त्यांचे कृत्य आहे. त्यावर प्रतिक्रिया देण्याचे इतर मार्ग असू शकतात. जर कायदेशीर लढा असेल तर तो लष्कराशी असू शकतो, परंतु महिला, मुले आणि निष्पाप यांच्याशी नाही.

या अर्थाने हमासने उचललेले पाऊल चुकीचे होते, त्याचा अधिक नुकसान झाला. हमासने जे केले त्याचा बदला फक्त हमासपुरता मर्यादित राहिला असता तर बरे झाले असते. पण आता इस्रायल सरकार जे काही करत आहे ते अतिशय घातक कृत्य आहे. ही मालिका आता थांबणार नाही असे वाटते. आम्ही गाझा पूर्णपणे पुसून टाकू, अशी इस्रायल सरकारची घोषणा होती. यासाठी त्यांनी जोरदार बॉम्बस्फोट केली आणि संपूर्ण शहर राखून टाकले. आता नवीन परिस्थिती अशी आहे की ते म्हणतात की दहा लाखांहून अधिक लोकांनी गाझा सोडावा. सुदैवाने हे मानवी हक्कांचे उल्लंघन असून ते चुकीचे आहे, असा दुर्बळ आवाज संयुक्त राष्ट्रसंघातून निघाला आहे. ते चुकीचे आहे असे ठामपणे सांगण्याऐवजी ते आजही विनंतीपूर्वक बोलत आहेत. तथापि, लढत नसलेल्या निष्पाप नागरिकांचा दोष नाही. जर जग इस्रायली स्त्रिया आणि मुलांना निर्दोष मानत असेल तर पॅलेस्टिनी महिला आणि मुलेही निर्दोष आहेत. अशा हत्यांना परवानगी नसल्याचेही ग्रंथधारी लोकांच्या धार्मिक ग्रंथामध्ये उल्लेख आहे. मुस्लिमांवर आरोप केले जातात की त्यांनी चूक केली, मग या लोकांनीही त्यांच्या आतमध्ये पाहावे.

तथापि, आपल्याला खूप प्रार्थनेची गरज आहे. पॅलेस्टाईनच्या राजदूताने म्हटले आहे की, हमास हा अतिरेकी गट असून सरकार नाही. त्याचवेळी त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला असून खरा न्याय प्रस्थापित झाला असता तर या गोष्टी उद्भवल्या नसत्या हा त्यांचा मुद्दा योग्य आहे. मोठमोठ्या शक्तींनी त्यांचे दुटप्पी निकष पाळले नाहीत तर अशी अशांतता आणि ही युद्धे कधीच होणार नाहीत. मी इस्लामी शिक्षणाच्या प्रकाशात या गोष्टी खूप दिवसांपासून सांगत आलो आहे, समोरून ते उचित आहे असे सांगतात, पण ते कृती करण्यास तयार नाहीत. आता सर्व प्रमुख पाश्चात्य शक्ती न्याय बाजूला ठेवून पॅलेस्टाईनवर अत्याचार करण्यासाठी एकत्र येत आहेत आणि सर्व बाजूंनी सैन्य पाठवण्याच्या चर्चा सुरू आहे. माध्यमांमध्ये चुकीचे वार्तांकन होत आहे. हे लोक ज्याची काठी त्याची म्हीश च्या विचारधारेला जडून आहेत. ज्यांच्या हातात जगाची अर्थव्यवस्था आहे, त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे लागेल. मागे पाहिल्यास असे दिसते की मोठ्या शक्ती युद्ध भडकवण्यात गुंतल्या आहेत. त्यांना हे युद्ध संपवायचे नाही.

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली, परंतु न्याय न मिळाल्याने ते अयशस्वी झाले आणि दुसरे महायुद्ध झाले, ज्यामध्ये सात लाख लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांची निर्मिती झाली पण आता त्याचेही तेच होत आहे

आणि तेही अपयशी ठरत आहे. त्यातून न्याय प्रस्थापित होईल आणि अत्याचारितांना आधार दिला जाईल म्हणून तो निर्माण झाला. युद्ध संपवण्याचा प्रयत्न असेल. पण त्यांच्या उद्देशांची पूर्तीच दिसत नाही. प्रत्येकजण आपापले हित शोधत आहे. आता या अन्यायामुळे युद्ध कधी होईल, त्यामुळे होणारे नुकसान सामान्य माणसाला कल्पनाही करता येणार नाही.

अशा परिस्थितीत मुस्लीम देशांनी जाणीवपूर्वक काम करून आपसातील मतभेद मिटवून एकता प्रस्थापित केली पाहिजे आणि हेच जगातून भ्रष्टाचार दूर करण्याचे साधन ठरू शकते. ऐक्य असेल तरच आवाजात बळ येईल, नाहीतर निरपराध मुस्लीमांच्या जीवितहानीला हे लोक जबाबदार असतील, मुस्लिम सरकारे जबाबदार असतील.

मुस्लिम शक्तींनी प्रेषितांचे हे विधान नेहमी त्यांच्यासमोर ठेवले पाहिजे की त्यांनी पिडीत आणि अत्याचारी दोघांनाही मदत केली पाहिजे. जगाला युद्धात ढकलण्याऐवजी विनाश आणि विधवंसापासून वाचवण्याचा प्रयत्न जगातील शक्तींनीही करावा. या महान शक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की जर आपत्ती आली तर या महान शक्ती देखील सुरक्षित राहणार नाहीत.

आमच्याकडे प्रार्थनेचे शस्त्र आहे, त्यामुळे प्रत्येक अहमदीने या संदर्भात पूर्वीपेक्षा जास्त प्रार्थना केली पाहिजे. काही अहमदी कुटुंबे देखील गाझामध्ये वेढलेली आहेत, अल्लाह त्यांचे रक्षण करो आणि सर्व निष्पापांचे रक्षण करो.

अल्लाह हमासला सुबुद्धी देवो आणि त्यांना त्यांच्याच लोकांवर अत्याचार करण्यास जबाबदार बनू नये. राष्ट्राचे शत्रुत्व हे न्यायापासून परावृत्त करू नये, हा पवित्र कुरआनचा आदेश आहे. अल्लाह या महान शक्तींना न्यायाच्या मागण्या पूर्ण करून शांतता प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य प्रदान करो. सर्वशक्तिमान अल्लाह आम्हाला जगात शांती आणि समृद्धी पाहण्याची वेळ देवो.

प्रवचनाच्या शेवटच्या भागात, हुजूर अनवर यांनी लंडनच्या दोन दिवंगत डॉ. बशीर अहमद खान साहिब (उपस्थित अंत्यसंस्कार) आणि पाकिस्तानचे डॉ. शफीक सेहगल साहिब यांच्या पत्नी श्रीम. वसीमा बेगम साहिब यांचा उल्लेख केला आणि नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ! اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ،
عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ
لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔